दैनिक

# अक्षराज

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO.: MAHMAR/2022/82056

## दीपावली विशेषांक २०२५



सर्व नागरिकांना दीपावली तसेच पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!
























# संपादकीय

## फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या !

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो त्यात दिवाळी या सणाला विशेष महत्व आहे. दिवाळी सणाला सणांचा राजा म्हंटले जाते कारण दिवाळी हा एकमेव असा सण आहे जो पाच दिवस चालतो. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचाच आवडीचा हा सण आहे. या सणाचा उत्साह काही औरच असतो. या सणाइतका आनंद दुसऱ्या कोणत्याच सणात नसतो. दिवाळी सण म्हणजे दिव्यांचा सण, प्रकाशाचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या कालावधीत पणत्या, मेणबत्त्या, आकाशकंदील, नवी खरेदी, नवे कपडे, मिठाई, रांगोळी, दिवाळी अंक, धार्मिक गोष्टी, मित्र – मैत्रीणी, नातेवाईकांच्या भेटी, कौटुंबिक संमेलन आणि फटाके या साऱ्या गोष्टी आल्या. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे फटाके. फटाके आणि दिवाळी हे तर जणू समीकरणच झाले आहे. फटाक्यांशिवाय दिवाळीच साजरी होऊ शकत नाही अशी आजची अवस्था आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच फटाके उडवतात. वास्तविक दिवाळी हा दिव्यांचा सण आहे, फटाक्यांचा नाही तरीही दिवाळीत फटाक्यांना अवास्तव महत्व दिले जाते. दरवर्षी दिवाळीत फटाके उडवू नका, फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्पिणामांचा फटका केवळ मानव जातीलच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीला बसतो त्यामुळे दिवाळीत फटाके उडवू नका. फटाके उडवायचेच असेल तर हरित फटाके उडवा असे आव्हान सरकारतर्फे तसेच अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांकडून केले जाते मात्र त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते. अर्थात काही लोक त्यांच्या आव्हानास प्रतिसाद देतात मात्र त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. फटाक्यांचे समर्थन करणारे नेहमी म्हणत असतात की दिवाळीतच फटाके न वाजवण्याचे आव्हान का केले जाते ? याचे कारण असे आहे की दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात. दिवाळी इतके फटाके इतर कोणत्याही वेळी वाजवले जात नाही. अधिक फटाके वाजवल्याने त्याचे दुष्परिणामही अधिक होतात. दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे प्रदूषण वाढते. आधीच आपल्या देशाची हवा प्रदूषित आहे. मुंबई – दिल्लीसारख्या शहरांच्या हवेने धोक्याची पातळी गाठली आहे त्यात जर फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली तर लोकांना श्वास घेणेही मुश्कील होईल तसे झाले तर त्याचा परिणाम केवळ मानवाच्याच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीच्या आरोग्यावर होईल. कॉपर, कँडियम, लेड, गंधक, फॉस्फरस, सल्फर, मॅग्नेशियम, सोडियम, झिंक, नायट्रेट आदी रसायनांपासून फटाक्यांची निर्मिती केली जाते. ही रसायने मानवी आरोग्यास घातक आहेत. फटाक्यातील कॉपरमुळे श्वसनमार्गात दाह होतो. त्यामुळे दम्याच्या रोगांच्या आजारात वाढ होते. हृदयविकार आणि फुफ्फुसांचे आजार होण्याची शक्यता असते. लेड मज्जासंस्थेवर परिणाम करते. कँडीयम मूत्रपिंडाचे नुकसान करते. सल्फर हे वनस्पतींसाठी घातक आहे. सल्फरमुळे वनस्पतींची वाढ खुंटते. सल्फरमुळे झाडांच्या फळावर अनिष्ट परिणाम होतो. ही फळे खाण्यात आल्यास खणाऱ्यांना विषबाधा होण्याचा धोका असतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांना खूप त्रास होतो. सतत चार ते पाच दिवस कानठळ्या बसवणाऱ्या आवाज ऐकल्यावर कायमचे बहिरेपणा येण्याची शक्यता असते. शिवाय फटाके फोडताना योग्य ती काळजी घेतली नाही तर अपघात होऊन कायमचे अपंगत्व येण्याची शक्यता असते. ऐन दिवाळीत फटाक्यांच्या दुकानांना किंवा कारखान्यांना आग लागून दुर्घटना घडल्याचे आणि त्यात जीवित आणि वित्त हानी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत हे देखील विसरता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार केला तर फटाके किती घातक आहेत हे लक्षात येईल. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची वेळ आली आहे. मानवी आणि सजीव सृष्टीवर परिणाम करणारे हानिकारक फटाके दूर ठेवून आपण दिवाळी साजरी केली तर वाढत्या प्रदूषणाला आळा घालता येईल शिवाय आरोग्यही चांगले राहील. चला तर मग फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या! फटाके दूर करून हा आनंदाचा सण साजरा करू या!!

## ऊस दराची कोंडी कोण फोडणारं ?
## संपूर्ण ऊस उत्पादकांसह साखर उद्योगाचं लक्ष...

नुकताच शेतकरी संघटनेचे संस्थापक, माजी खासदार राजू शेट्टींची जयसिंगपूर येथे २४ वी ऊस परिषद संपन्न झाली यावेळी त्यांनी मागील वर्षी तुटलेल्या उसाला २०० आणि यंदाच्या हंगामात ३७५१ रुपये विनाकपात एकरकमी दर मिळावा म्हणून रणशिंग फुंकले आहे त्यामुळे यंदाच्या हंगामातील ऊस दराची कोंडी कोण फोडणारं ? असा सवाल उपस्थित होतो आहे इतका दर दिला तरचं हंगाम व्यवस्थित पार पाडले अन्यथा शेतकरी आणि साखर सम्राटांचा संघर्ष अटळ असल्याचे ठणकावून सांगितले आहे १० नोव्हेंबर पर्यंत ऊस दराचा निर्णय न झाल्यास ११ पासून शेतकरी ऊसाचा बुडका हातात घेवून रस्त्यांवर उतरेल अशी गर्जना केली आहे.

त्यामुळे साखर कारखानदार काय भूमिका घेतात याकडे संपूर्ण ऊस उत्पादकांसह साखर उद्योगाचं लक्ष लागून राहिले आहे गेल्या पाच वर्षापासून ऊसदराच्या एफ. आर. पी. मध्ये वाढ झाली मात्र शेतक–यांना वाढीव एफ. आर.पी. चा कोणताच फायदा झाला नाही. खते, बि बियाणे , किटकनाशके , मजूरी , मशागत व तोडणी– वाहतूक यामध्ये भरमसाठ वाढ झाली आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार साखर उद्योगात दुर्लक्ष करू लागल्याने साखरेसह उपपदार्थाबाबत चुकीचे निर्णय होवू लागले आहेत जागतिक बाजारपेठेत साखर आणि इथेनॉलला मागणी मोठी असून गॅस व वीज निर्मितीतून मोठ्या प्रमाणात रक्कम मिळते पण साखर सम्राट कमी रिकव्हरी दाखवून शेतकऱ्यांना लुटतं आहेत नैसर्गिक आपत्ती, महापूर, अतिवृष्टी यासारख्या अस्मानी व सुल्तानी संकटाने शेतकरी रसातळाला गेला आहे आगामी काळात महानगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका होवू घतल्या आहेत त्यामुळे त्याचीहि या ऊस दराला किनार असणारं आहे त्याचं पार्श्वभूमीवर शेट्टींनी शेतकऱ्यांना यंदाच्या हंगामातील उसाला चांगला दर मिळणारं असल्याचे संकेत दिले आहेत यंदा अतिवृष्टीने ऊस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे या उलट साखर कारखानदारांनी गाळप क्षमता वाढवली असल्याने ऊस कमी पडणारं असून आहे त्या उसाला योग्य दर मिळणारं आहे त्यासाठी ऊस उत्पादकांनी कोणत्याही प्रकारची घाईगडबड न करता चांगला दर मिळाल्याशिवाय आपल्या ऊसाला तोडी घेवू नयेत असे आवाहन देखील त्यांनी केले आहे त्यामुळे आगामी काळात ऊस दराचा तिढा कोण आणि कसा सोडवतो ते पहाणे मोठे औत्सुक्याचे ठरणारं आहे !

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

# लक्ष्मीपूजन नक्की असते काय?




आश्विन अमावास्येस लक्ष्मीपूजन केले जाते.

या दिवशी प्रदोषकाळी (संध्याकाळी) लक्ष्मीचे पूजन केले जाते.लक्ष्मी ही फार चंचल असते असा समज आहे.त्यामुळे, शक्यतोवर हिंदू शास्त्राप्रमाणे लक्ष्मीपूजन हे, लक्ष्मी स्थिर रहावी म्हणून, स्थिर लग्नावर करतात. त्यानेलक्ष्मी स्थिर राहते असा समज आहे. अनेक घरांत श्रीसूक्तपठण ही केले जाते. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष (विक्रम संवत्) लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते.

या दिवशी सर्व अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी काढून तांदूळ ठेवतात. त्यावर वाटी किंवा तबक ठेवतात. त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रुपया, दागिने ठेवून त्यांची पूजा करतात. हा दिवस व्यापारी लोक फार उत्साहात साजरा करतात. या दिवशी लोक स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणीविकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरुवात करतात. केरसुणीने घर स्वच्छ होवून घरातील अलक्ष्मी म्हणजे दारिद्र्य दूर होते असे मानले जाते.

प्राचीन काळी या रात्री कुबेरपूजन करण्याची रीत होती. कुबेर हा देवांचा खजिनदार आणि धनसंपत्तीचा स्वामी मानला जातो.दीपप्रज्वलन करून यक्ष आणि त्यांचा अधिपती कुबेराला निमंत्रित करून त्याची पूजा करणे हा मूळचा सांस्कृतिक कार्यक्रम होता.

परंतु गुप्तकाळात वैष्णव पंथाला राजाश्रय मिळाल्याने आधी कुबेराबरोबरच लक्ष्मीचीही पूजा होऊ लागली. भारतात, विविध ठिकाणी झालेल्या उत्खननात कुशाण काळातील अनेक मूर्ती सापडल्या आहेत. त्यांमध्ये कुबेर आणि लक्ष्मी एकत्र दर्शविले आहेत. काही मूर्तींमध्ये कुबेर त्याची पत्नी इरितीसह दाखविला आहे. यावरून असे दिसते की प्राचीन काळी कुबेर आणि त्यांची पत्नी इरिती यांची पूजा केली जात असावी. कालांतराने इरितीचे स्थान लक्ष्मीने घेतले आणि पुढे कुबेराच्या जागी गणपतीला प्रतिस्थापित केले गेले.

अलक्ष्मी म्हणून ज्या देवतेला मध्यरात्री हाकलून देण्याची प्रथा आहे, तीच खरी या सणाची इष्ट देवता असल्याचेही म्हटले जाते. तिला ज्येष्ठा, षष्टी वा सटवी, निर्ऋती या नावांनीही ओळखतात. निर्ऋती ही सिंधू-संस्कृतीतील मातृदेवता समजली जाते. तिला ब्राह्मणी संस्कृतीने अलक्ष्मी म्हणून तिरस्कारले असले तरी ती राक्षसांची लक्ष्मी आहे असे देव मानत असल्याचे उल्लेख दुर्गासप्तशतीमध्ये आहेत.

लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने ‘आर्थिक व्यवहारातील सचोटी व नीती’ आणि ‘अर्थप्राप्तीच्या साधनांविषयी कृतज्ञता’ अशी दोन महत्त्वाची मूल्ये मनात रुजतात, ही या पूजेची विशेषता आहे.

भगवान महावीर मोक्षाला गेल्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी महावीरांचे प्रमुख शिष्य गौतम गणधर यांना केवल ज्ञान प्राप्त झाले म्हणूनच दिवाळीच्या संध्याकाळी लक्ष्मीपूजन केले जाते ते संपत्तीरूपी लक्ष्मी मिळवण्यासाठी नव्हे, तर मोक्ष-लक्ष्मी किंवा आत्मकल्याणरूपी लक्ष्मी मिळवण्यासाठी. गणधर त्यांचा दिव्य-ध्वनी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवितात. दिवाळीसाठी पूर्वी जमिनीवर आणि राजस्थानातील प्रथेप्रमाणे तांदळाच्या ओल्या पिठाची रांगोळी काढतात. त्याला ‘मांडणे’ असे म्हणतात. त्यावर पाट मांडून लक्ष्मीपूजन किंवा ओवाळणे आदी विधी केले जाते.

**श्री.भास्कर देवराव शिनगारे**
**मु. बेंद्री, ता.भोकर, जि.नांदेड**
**मो.क्र. ८३९०६३३४९२**

# समाधानाचे वरदान दीपोत्सव...!!

**समाधानाचे**
**वरदान दीपोत्सव...!!**
**!! तेजोमय दीपोत्सव**
**समृद्धीचे दान !!**
**!! मनामनात नांदो**
**सुखशांती समाधान !!**

वसुबारसपासून सुरू झालेला यावेळचा दीपोत्सव

तितकाच उत्साह आणि आत्मविश्वास घेऊन आलेला आहे. या दीपोत्सवात मिणमिणाऱ्या पणतीपासून ते आकाशातल्या आतषबाजीतून उत्साहाची ऊर्जा ओसंडून वाहताना दिसते. छोट्याशा पणतीतून टीचभर वात पण मनामनातल्या अंधारावर प्रचंड मात करते. त्या पणत्यांकडे पाहिल्यानंतर मनातले नैराश्य सहजपणे पिटाळले जाते. आपल्या शक्ती आणि कुवतीप्रमाणे ही छोटीशी पणती आपल्या आजुबाजूचा अंधार दूर करते. आणि लांबवरच्या पांथस्थालासुद्धा आशेचा किंवा आत्मविश्वासाचा किरण दाखवते. खरे तर दीपोत्सवाचा हाच मोठा संदेश ठरतो. कितीही संकटं आली, आव्हानं आली तरीसुद्धा न डगमगता आपल्या शक्ती आणि कुवतीप्रमाणे प्रकाशाचा मार्ग शोधता येतो. आणि आपल्याच आत्मविश्वासातून आकाशालाही गवसणी घालता येते. अशा प्रकारचा उत्साह आणि ऊर्जा देण्याचे काम या दीपोत्सवाच्या माध्यमातून होते. कोणताही संकल्प किंवा उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागतेच. हे प्रयत्न करताना येणाऱ्या अडचणींना शरण न जाता त्यातून मार्ग काढता येतो. आणि स्वतःबरोबर इतरांसाठीदेखील सहाय्यभूत होता येते. म्हणूनच पणती किंवा आकाशकंदीलातील प्रकाश हा आत्मविश्वास जागवणारा असतो. विशेष म्हणजे मन आणि शरीराचा निसर्गाशी समन्वय साधून एक अनोखे समाधानही प्राप्त करता येते. ही किमया फक्त भारतीय संस्कृतीतच पाहायला मिळते. कारण दूर डोंगरावरची एखादी झोपडी जरी असली तरी तिथे तेवणारा आकाशकंदील आणि गर्भश्रीमंतांच्या बंगल्यांवर लटकणारे आकाशदिवे या दोघांकडे पाहिल्यानंतर आनंद आणि समाधान समान स्वरूपात प्राप्त होते. म्हणजेच आपल्या मनाच्या व्यापकतेला आकाशाचे कोंदण प्राप्त करता येते. हेदेखील या दीपोत्सवाचेच अनोखे वैशिष्ट्य आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात वसुबारसला होणारी गोधनाची पूजा किंवा आजची संपन्नतेचा विचार सांगणारी धनत्रयोदशी म्हणजे आपल्याकडे असलेल्या धनाविषयी आदर व्यक्त करण्याची मोठी संधी असते.

**समृद्धीचे वरदान...**

संपूर्ण दीपोत्सव हा समृद्धी आणि संपन्नतेचे वरदान देणारा असतो. आपल्याकडे जे आहे किंवा जे प्राप्त झाले आहे. त्याच्याविषयी कृतज्ञ राहून आनंदी राहण्याचा संस्कार हीसुद्धा मनाची समृद्धीच असते. स्वतः जवळ असलेल्या धनाचा विचार न करता अशाश्वत सुखाच्या मागे न धावता स्वतःमध्येच असलेल्या आनंदाला ओळखून समाधान प्राप्त करता येते. आणि याच प्रवृत्तीला संपन्नता किंवा संपत्ती म्हणता येते. भारतीय संस्कृतीने अन्य कोणत्याही भौतिक सुखापेक्षा विचार आणि संस्कारांच्या संपन्नतेला सर्वाधिक महत्त्व दिलेले आहे. आजची धनत्रयोदशी याच मनरूपी धनाचे स्मरण करणारी म्हटली पाहिजे. प्राचीन काळात आजच्यासारखे चलन किंवा पैसा अडका नव्हता. शेतीतून मिळणारे अन्नधान्य हीच संपत्ती मानली जायची. त्याचीच देवाणघेवाण होऊन समाजातले जीवन

व्यवहार चालू असायचे. आणि हेच खरं धन आहे, असे मानून त्याचीच पूजाअर्चाही केली गेली. पुराणकथांमधून आजच्या दिवशी समुद्रमंथनातून धन्वंतरी देवता प्रकटली. तिच्या हाती अमृतकलश होता. म्हणजेच समाजाच्या आयुरारोग्यासाठी उपयुक्त असे अमृत धन्वंतरीने देवाधिकांना दिले होते. परंतु त्याचा मतितार्थसुद्धा हाच आहे की, समुद्राचं मंथन करून जगाच्या हितासाठी अमृत प्राप्त करता येते.



**श्री. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**कागल-कोल्हापूर**

भारतीय संस्कृती हीसुद्धा अशाच विचार आणि संस्कारांच्या माध्यमातून समाजहिताचे सण, उत्सव साजरे करणारी आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सगळ्या प्रकारचे भेद मावळतात. आणि आनंदाचा समान अनुभव या दीपोत्सवातून किंवा सणउत्सवातून प्रत्येकाला घेता येतो. दीपावलीतले पणत्यांचे महत्त्व आजही का टिकून आहे. तर याचे रहस्यच हे सण उत्सव सामान्यातल्या सामान्य माणसाचा त्याच्या परिस्थितीचा विचार करणारे आहे. अशांचाही आत्मविश्वास दुप्पट करण्याचे काम या उपक्रमातून होत राहते. म्हटलं तर दीपोत्सव हा हिंदू संस्कृतीचा एक अविभाज्य सण ठरतो. तर दुसरीकडे हाच दीपोत्सव व्यापक अथनि संपूर्ण विश्वाला आनंदमय जीवन जगण्याचं रहस्य सांगून जातो. व्यक्ती किंवा मनुष्यजीवन म्हटल्यावर काही ना काही कारणांमुळे अपयश किंवा नैराश्य येण्याची शक्यता असते. परंतु त्याला कवटाळून न बसता सतत पुढे जाण्याचा किंवा आपले संकल्प सिद्ध करीत राहण्याची ऊर्जा या दीपोत्सवातून मिळते.

**सातत्यपूर्ण शृंखला...**

सलग पाच दिवस साजऱ्या होणाऱ्या या प्रकाशपर्वामध्ये प्रत्येक दिवसाचे एक आगळेवेगळे महत्त्व नोंदले गेले आहे. नरकचतुर्दशीच्या दिवशी पहाटेच्या अभ्यंगस्नानाचे महत्त्व सांगून स्वतःमधल्या आणि समाजातल्या विकृतींवर विजय मिळवण्याचा संदेश दिला जातो. बलिप्रतिपदेला संपत्तीचा अहंकार कसा घातक ठरतो, हे सांगून ज्यांच्यामुळे समृद्धी किंवा समाधान प्राप्त होते त्यांच्याविषयी कृतज्ञता आणि आदर ठेवण्याची शिकवण दिली गेली. म्हणूनच या दिवशी घरातल्या वडिलधाऱ्यांविषयी निष्ठा व्यक्त करण्याची संधी प्राप्त होते. भाऊबीजेला बहीण भावातल्या स्नेह आणि प्रेमाचा सर्वोच्च क्षण अनुभवता येतो. शिवाय समाजातल्या बंधुभावालादेखील नकळतपणे प्राधान्य मिळते. अगदी अश्विन अमावास्येच्या दिवशी होणारे लक्ष्मीपूजन म्हणजे सन्मानि प्राप्त केलेल्या लक्ष्मीची आराधना करण्याचा आणि ती तितक्याच चांगल्या कामासाठी विनियोग करण्याचा विचारही सांगितला गेला. या सगळ्यांमधून सारांशरूपाने एक सकारात्मक ऊर्जेचाच संस्कार दृढ होताना दिसतो. व्यक्तीपासून समाजापर्यंत प्रत्येकाने सामंजस्य आणि सहकार्याचेदेखील महत्त्व व्यक्त केले जाते. या काळात एकमेकांना दिल्या जाणाऱ्या शुभेच्छा म्हणजे भारतीय संस्कृतीने रूजवलेला सर्वत्र ‘सुखिनः सन्तुचा’ मूलभूत आविष्कार ठरतो. व्यक्ती आणि समाजातल्या जाणीवांना सतत प्रगल्भ करीत राहणे स्वार्थ संकुचितता नाहीशी करीत राहणे असा विचार दृढ करीत राहण्याची एक सातत्यपूर्ण शृंखला म्हणजेच दीपोत्सव ठरतो.

# स्वस्थ नारी म्हणजे सशक्त परिवाराची पायाभरणी !

समाजाच्या आरोग्याचा व देशाच्या विकासाचा पाया म्हणजे स्त्रीचे आरोग्य. कारण नारी हीच एका परिवाराची, समाजाची आणि अखेर राष्ट्राची मूळ शक्ती आहे. स्त्री निरोगी असेल तरच घर आनंदी असते आणि घर आनंदी असेल तरच समाज सक्षम होतो. हा विचार आपण मान्य केला, तर ‘स्वस्थ नारी – सशक्त परिवार’ हे फक्त घोषवाक्य न राहता भारताची दिशा दाखविणारा विचार आहे व हाच विचार भविष्यातील प्रत्यक्ष आयुष्याचा मंत्र ठरेल. कारण स्त्री निरोगी असेल तर तिच्या मुलांचे आरोग्य चांगले राहते; घरातील इतर सदस्यांवरही तिचा सकारात्मक परिणाम होतो. परिवारातील प्रत्येक सदस्याचे आरोग्य हे आईच्या आरोग्यावर अवलंबून असते. जर आई निरोगी असेल तर तिचे मूलही निरोगी वाढते. स्त्रीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता तिला नियमित वैद्यकीय तपासणी, मानसिक शांती आणि कुटुंबाकडून आधार मिळाले तर संपूर्ण कुटुंब सक्षम, निरोगी आणि आनंदी राहते. म्हणूनच स्वस्थ नारी हीच सशक्त परिवाराची खरी गुरुकिल्ली आहे. सामाजिक पातळीवर मानसिकता बदलणे, महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

आज स्त्रिया शिक्षण, उद्योग, नोकरी, राजकारण या क्षेत्रांत झेपावत असल्या तरी त्यांच्या आरोग्याकडे अजूनही दुर्लक्ष केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतातील निम्म्याहून अधिक स्त्रिया रक्ताल्पतेने ग्रस्त आहेत. प्रसूतीदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा न मिळाल्याने मातामृत्यू दरही चिंताजनक आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये रक्ताल्पता, कुपोषण, प्रसूतीसंबंधी आजार अजूनही चिंतेचा विषय आहेत. शहरी भागात मात्र मधुमेह, स्थूलता, हृदयविकार यांसारखे जीवनशैलीशी निगडीत आजार वाढत आहेत.

घरातील जबाबदाऱ्या, नोकरीतील ताण, समाजाच्या अपेक्षा या सगळ्यामुळे स्त्रीच्या आरोग्याकडे सर्वात शेवटी लक्ष दिले जाते. पण आकडेवारीच्या पलीकडे एक वेगळीच गोष्ट




**स्त्री म्हणून जगतांना खुप काही करावं लागतं**
**आयुष्य तिचे असते पण दुसऱ्यासाठी जगावं लागतं**

आहे. घरातील स्त्री जर आजारी पडली, तर घरातील वातावरणच बदलून जाते. मुलांच्या चेहऱ्यावरचे हसू हरवते, वृद्धांना आधार उरत नाही आणि पुरुष अस्वस्थ होतो. कारण नारी ही घराचे हृदय आहे. तिच्या हसण्यात कुटुंबाचे सौख्य दडलेले असते, तर तिच्या थकलेल्या नजरेत घराचे दुःख उमटते.

आज सरकार विविध आरोग्य योजना राबवत आहे, जसे प्रसूतीसाठी मोफत वैद्यकीय सेवा, पोषण आहार योजना, महिलांसाठी योग शिबिरे, स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतागृह सुविधा पण केवळ सरकारी पातळीवर काम करून चालणार नाही. प्रत्येक परिवाराने, समाजाने, कुटुंबाने जागरूक होणे गरजेचे आहे. तसेच, आजच्या आधुनिक समाजात महिला शिक्षण, रोजगार, राजकारण, उद्योग या क्षेत्रात वेगाने प्रगती करत असल्या तरी आरोग्याच्या बाबतीत अजूनही मोठ्या अडचणी दिसून येतात. घरातील प्रत्येकाने हे लक्षात ठेवावे की, मुलींच्या आहाराची काळजी घेणे, किशोरवयीन मुलींना योग्य आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण देणे, स्त्रियांना नियमित आरोग्य तपासणीस प्रवृत्त करणे, घरकामात पुरुषांनी समतोल सहभाग वाढवणे आणि मानसिक आरोग्याबद्दल मोकळेपणाने संवाद साधने. या बाबी महिला आरोग्यासाठी महत्त्वाच्या ठरतात आणि या गोष्टींचा अवलंब झाला तरच ‘स्वस्थ नारी-सशक्त परिवार’ हा विचार प्रत्यक्षात उतरू शकेल. त्यासाठी कटिबध्द राहणे गरजेचे आहे, तेव्हाच हे शक्य होईल.

आज आपल्याला हे मान्य करावे लागेल की स्त्री ही फक्त घर चालवणारी नाही, तीच घर घडवणारी आहे. तिचे आरोग्य बळकट असेल तर कुटुंब आनंदी राहील आणि आनंदी कुटुंबातूनच सक्षम राष्ट्र उभे राहते. स्त्री निरोगी असेल तरच कुटुंब सशक्त होईल आणि राष्ट्र अधिक प्रगत होईल. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्यापासून सुरुवात करून स्त्रीच्या आरोग्याचे आणि सन्मानाचे रक्षण करणे हिच आजची खरी सामाजिक जबाबदारी आहे. शेवटी, निरोगी स्त्री, निरोगी पिढी, आनंदी घर म्हणजे सशक्त समाज आणि सशक्त समाज म्हणजे सक्षम राष्ट्र.

स्त्री पुरुष दोघंही समान आहेत आणि सुख मिळविण्यासाठी धडपडणं हा दोघांचाही अधिकार आहे. फक्त पुरुषांना आयुष्यभर सुखात राहावं आणि दु:खाची विभागणी संपली पाहिजे. माणूस या नात्यानं पुरुषाला मिळतं ते जन्मसिध्द स्वातंत्र्य स्त्रीलाही मिळालं पाहिजे. ही स्त्री भूतकाळाशी जोडलेली असते, भावूक आणि हळवी असते.

कुटुंबाचा सांभाळ करते, स्वत:ला निराधार वाटत असतांनाही कुटुंबाला आधार देते, पती, मुलगी, मुलगा यांच्यावर प्रेम करते. कधी त्यांचा दुरावा जाणवल्यावर येणारी विफलताही अनुभवते, ती व्यवसायात ही कर्तव्यदक्ष असते. एकंदरीत तिचा सहभाग महत्वाचा हे विसरुन चालणार नाही. चूल आणि मूल मध्ये गुरुफटलेल्या, चालीरितीच्या कुंपणात वावरणाऱ्या स्त्रीला समाजभय संकोच यामध्ये पार दडपून टाकलेलं, पण काळाच्या ओघात परिवर्तनाशिवाय पर्याय नाही. या सबबीनंतर तिने टोकाचे पाऊल उचलून भरारी घेण्याचं ठरवलं. कुटुंबाबरोबरच समाजाच्या उभारणीतही मोलाची भूमीका बजावत आहे, अशा या सशक्त नारीला मानाचा मुजरा !

**– प्रविण बागडे**
**नागपूर, ९९२३६२०९१९.**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२


सर्व जनतेस दीपावलीच्या
हार्दीक शुभेच्छा!
संजय जाधव
अपर पोलीस आयुक्त
पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण
अतुल झेंडे
पोलीस उपायुक्त परिमंडल ३
कल्याण
सचिन गोरे
पोलीस उपायुक्त परिमंडळ ४
शैलेश काळे
सहाय्यक पोलीस आयुक्त
उल्हासनगर विभाग
कल्याणजी घेटे
सहाय्यक पोलीस आयुक्त
कल्याण विभाग
अमोल कोळी
सहाय्यक पोलीस आयुक्त
अंबरनाथ विभाग
किरण बालवडकर
सहाय्यक पोलीस आयुक्त
कल्याण वाहतूक विभाग
आशितोष बारकुल
उप प्रादेशिक अधिकारी
कल्याण
सचिन सांडभोर
पोलीस निरीक्षक
कोळसेवाडी वाहतूक शाखा
श्रीराम पाटील
सहाय्यक पोलीस निरीक्षक
डोंबिवली वाहतूक शाखा प्रभारी
गणेश जावेदवाड
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
रामनगर पोलीस ठाणे
मनीषा वर्पे
पोलीस निरीक्षक
मानपाडा पोलीस ठाणे
संदिपान शिंदे
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मानपाडा पोलीस ठाणे
गहिनीनाथ गमे
पोलीस निरीक्षक (गुन्हे)
विष्णुनगर पोलीस स्टेशन
गणेश न्हायदे
पोलीस निरीक्षक (गुन्हे )
कोळसेवाडी पोलीस स्टेशन
राजेश शिरसाठ
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
उल्हासनगर वाहतूक उपविभाग
संपत फडोळ
सहाय्यक पोलीस निरीक्षक
मानपाडा पोलीस ठाणे
रामदास कोकरे
घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त
कल्याण डोंबिवली महानगरपालिका
सुनील कदम
पोलीस निरीक्षक
वाशी वाहतूक शाखा
विजयकुमार कदम
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
टिळक नगर पोलीस ठाणे
संदीप शिवले
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
हिल लाईन पोलीस स्टेशन
मिलिंद झोडगे
पोलीस निरीक्षक
कल्याण वाहतूक शाखा
शिवाजी भांडवलकर
पोलीस निरीक्षक
नवी मुंबई एपीएमसी वाहतूक शाखा
संतोष आव्हाड
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
उल्हासनगर पोलीस ठाणे
राजेंद्र खिल्लारे
पोलीस हवालदार
मानपाडा पोलीस ठाणे
नाना आव्हाड
पोलीस नाईक
उल्हासनगर वाहतूक शाखा
जितेंद्र पाटील
पोलीस शिपाई
उल्हासनगर पोलीस ठाणे


सर्व नागरिकांना
दीपावली तसेच पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
शुभ
दीपावली
आश्विनी गणेश भवार
रील स्टार ॲक्टर
श्री.गणेश भवार
मनसे विभाग अध्यक्ष सीबीडी
दैनिक अक्षराज सीबीडी बेलापूर पत्रकार


शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
सर्व नागरिकांना दीपावली तसेच
पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!
शुभ
दीपावली
कु. शशिकांत (शशि) गंगाधर पाटील
शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष) शाखाप्रमुख डायघर,
कल्याण फाटा व माथाडी कामगार युनियन अध्यक्ष,
भूमिकन्या आणि भूमिपुत्र सामाजिक सेवा संस्था
कळवा – ठाणे जिल्हा उपाध्यक्ष


दिपावली निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा...!
तनिष्का
THE BAR
तनिष्का बार कल्याण शिळ रोड डोंबिवली पूर्व
तारांगण हॉटेल अँड रेस्टॉरंट
डोंबिवली पश्चिम मोठा गाव रेल्वे फाटक जवळ


सर्व नागरिकांना
दीपावली तसेच पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
शुभ
दीपावली
सौ.मेघा श्रीराम महाजन
एजेंट : भारतीय जीवन विमा निगम
अध्यक्ष : कलासाधना सामाजिक संस्था नवी मुंबई
संचालिका : ग्लोबल गोल्ड टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड
मो.बा. ९९६७५८७३०० / ८६८९८३५६०५


सहजयोग आजचा महायोग
सहज योग परिवार नवी मुंबई व श्री आदिशक्ती
सामाजिक संस्था नवी मुंबई तर्फे सर्वांना
जय श्री माताजी
दीपावलीच्या
हार्दीक शुभेच्छा!
परम पूज्य श्री माताजी निर्मला देवी यांच्या
कृपा आशीर्वादाने कुंडलिनी शक्तीची जागृती
आणि आत्मसाक्षात्काराची
अनुभूती घेण्यासाठी एकदा अवश्य भेट द्या
श्री आदिशक्ती सामाजिक संस्था नवी मुंबई
अधिक माहितीसाठी संपर्क
९८२०१६६९२८
९८३३०६६६८३
९८३३६६२७३१


विद्यादीप विद्यालय, कोपरखैरने, नवी मुंबई
पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक विभाग
ANGEL KIDZEE ENGLISH SCHOOL
PRE PRIMARY PRIMARY SECTION
तर्फे सर्व जनतेस
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभ
दीपावली
सौ.नेहा मारुती गवळी
मुख्याध्यापिका विद्यादीप विद्यालय
मुख्य समन्वयक, महाराष्ट्र राज्य शिक्षक समन्वयक संघ
राज्य महिला अध्यक्षा, स्वाभिमानी शिक्षक संघटना महाराष्ट्र


सर्व नागरिकांना
दीपावली तसेच
पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...!
शुभ
दीपावली
श्री.एन.एन.पिंगळे
ग्राम महसूल अधिकारी
तथा जन माहिती अधिकारी शिळ
तालुका ठाणे, जिल्हा ठाणे.


।। सियावर रामचंद्र की जय ।।
दिवाळीचा पहिला दिवा लागता दारी, सुखाचे किरण येती घरी,
पुर्ण होवोत तुमच्या सर्व ईच्छा, सुखी होवो तुमचा
आयुष्य आणि आरोग्य, आमच्याकडुन तुम्हाला
आणि तुमच्या परिवाराला दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा...!
श्री. साहिल बाळाराम पाटील
अध्यक्ष:- भारतीय जनता युवा मोर्चा दिवा - शिळ मंडळ (ठाणे शहर)


सर्व नागरिकांना
दीपावली तसेच पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
समर्थ फ्लोअर मिल
FREE HOME DELIVERY
Minimum 5KG Required
सर्व प्रकारची धान्य योग्य दरात दळून मिळतील.
आमच्या इथे तांदूळ, ज्वारी, गहू, बाजरी,
नाचणीचे तयार पीठ योग्य दरात मिळेल.
(पिठाची गिरणी) मंगळवार बंद राहील
अण्णासाहेब वाघमोडे
प्रो.प्रा. समर्थ फ्लोअर मिल,
सेक्टर ५, करंजाडे, नवी मुंबई
९३२४१०८१३४

# भाऊबीज




भाऊबीज हा हिंदुधर्मीय भाऊ-बहीण साजरा करीत असलेला एक सण आहे. हा सण कार्तिक शुद्ध द्वितीया (यम द्वितीया) या दिवशी असतो. हा महाराष्टीय पद्धतीच्या दिवाळीतला सहावा दिवस असतो. या सणास हिंदीत भाईदूज म्हणतात.

या दिवशी बहिणीच्या किंवा स्वतःच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला ओवाळते. भाऊ मग ओवाळणीचे ताटात 'ओवाळणी' देऊन बहिणीचा सत्कार करतो.

कायस्थ समाजाचे लोक या दिवशी चित्रगुप्ताच्या देवळात जाऊन दौत-टाकाची आणि चित्रगुप्ताची पूजा करतात. या दिवशी यमराजाने आपली बहीण यमुनेच्या घरी जाऊन तिला वस्त्रे अलंकार इत्यादी वस्तू देऊन तिच्या घरी भोजन केले म्हणून या दिवसाला यमद्वितीया म्हणतात. या दिवशी यमुना नदीत स्नान करणे अत्यंत पवित्र मानतात म्हणजे असे केल्यामुळे त्यावर्षी यमपासून तरी भय नसते असा समज आहे. यम आणि यमी या भावा-बहिणीच्या प्रेमाबद्दल अशी कथा आहे की यम मृत्यू पावला त्यावेळी यमीला एवढे दुःख झाले की ती आपली रडणे व डोळ्यांतील अश्रू काही केल्या थांबवेना. तेव्हा शेवटी दिवस संपला हे दाखवण्यासाठी देवाने रात्र निर्माण केली आणि मग यमीचे भावा बद्दल चे दुःख थोडेसे हलके झाले तेव्हापासून भाऊबीजेची प्रथा पडली. आपल्या भावाचे आयुष्य वाढावे म्हणून बहिणीने यमराजाची पूजा आणि प्रार्थना करवयाची.

या दिवशी बहीण भावाला आरती ओवाळून त्याची पूजा करीत असते त्याला प्रेमाचा टिळा लावते तो टिळा बहिणीच्या निस्वार्थी प्रेमभावना व्यक्त करीत असतो भावाची पूजा म्हणजे यमराजाच्या पाशातून म्हणजे मृत्यूपासून भावाची सुटका व्हावी व तो चिरंजीव राहावा हा यामागचा उद्देश असतो. भाऊ आपल्या यथाशक्तीप्रमाणे पैसे कापड दागिना असे वस्तू ओवाळणी टाकतो. या दिवशी घरी जेवण करू नये व पत्नीच्या हातचे जेवण करू नये असे धर्मग्रंथात सांगितले आहे. जवळचा किंवा दूरचा भाऊ नसल्यास चांदोबास ओवाळण्याची पद्धत आहे आपल्या सणामागे असलेल्या कल्पनांची विशाल पण यावरून दिसून येते.

**- श्री.भास्कर शिनगारे**
**मु.बेंद्री ता. भोकर जि.नांदेड**

# फटाके कि पुस्तके ?

दिवाळसण आला आहे, त्यानिमित्ताने घरातील साफसफाई रंगरंगोटी चालू झाली आहे.भारतीय संस्कृतील प्रमुख सणापैकी एक अत्यंत महत्त्वाचा सण म्हणून दिवाळीला ओळखले जाते. त्यानिमित्ताने नवीन कपडे,नवीन वस्तूंची खरेदी चालू झाली आहे. फटाक्यांची दुकाने उभारली जात आहे. या दिवाळसणानिमित्त लहान मुलांपासून तरुण मंडळी पर्यंत अगदी बसूबारस पासून तर भाऊबीज पर्यंत फटाके फोडण्याचा आनंद लुटत असतात. लवंगी फटाके, टिकल्या, सुरसुरी, झाड, चक्री, सुतळी बॉम्ब, रॉकेट असे अनेक प्रकारचे फटाके बाजारात उपलब्ध असतात व लहान मुले फटाके फोडण्याचा हट्ट करतात. महागाईच्या दृष्टिकोनातून विचार केला तर खूप महागडी फटाके बाजारात उपलब्ध असतात व आपण सण साजरा करायचा म्हणून खरेदी करतो व कितीतरी पैशांचा अपव्यय होतांना दिसून येतो. अगदी खेड्यापाड्यापासून तर मोठमोठ्या शहरांमध्ये फटाक्यांची मोठमोठे दुकाने आपण बघतो व खरेदीसाठी ग्राहकांची खूप गर्दी दुकानात दिसून येते. आपण आपआपल्या ऐपतीप्रमाणे फटाकांची खरेदी करतो सर्वसाधारण एका एका कुटुंबामध्ये एक हजारच्याही पुढे तर दहा हजारापर्यंत फटाके खरेदी करून फोडतात, पण आपण कधी मनाशी विचार केला का, की एखाद्या पुस्तकालयामध्ये जाऊन एक- दोन हजार रुपयांची पुस्तके खरेदी करुया तर मुळीच नाही.

फटाक्यामुळे कर्णकर्कश आवाज होतो.सभोवतालचे वातावरण ध्वनी प्रदूषणाने व वायू प्रदर्शनाने पूर्णतः दुषित होते. याउलट पुस्तक आपल्याला अगदी शांत राहायला शिकवतात. त्यांच्यापासून कुठल्याही प्रकारचा आवाज नाही प्रदूषण नाही, तर मनातील दूषित - प्रदूषित विचार घालवतात.ज्ञानात वृद्धी होते. वैयक्तिकच काय समाजाला सुद्धा त्रास नाही. फटाक्यामुळे व त्यातील ज्वलंत पदार्थ, दारू यामुळे रस्त्या - रस्त्यावर दुसऱ्या दिवशी कचराच कचरा साचलेला दिसतो, त्यामुळे भूप्रदूषण होते. आपली वसुंधरा, धरणी माय प्रदूषित होते. पुस्तक वाचनामुळे मात्र सुविचार, संस्कार शील ज्ञानामुळे डोक्यातील वाईट विचार



रुपी घाण साफ करण्याचे काम होते.फटाके क्षणाच्या आवाजात नष्ट होतात त्यांच्या लवलेशही शिल्लक राहत नाही मात्र, पुस्तके खरेदी केल्यास ते आपल्याकडे कायमस्वरूपी सोबत राहतात. आपण संग्रहित करून ठेवलेली पुस्तके केव्हाही वाचू शकतो, त्यातून आपल्याला आनंद निर्मिती होते. ती सुद्धा क्षणापुरती नाही तर कायम स्वरूपाची! फटाके फोडल्यानंतर हवेत विरून जातात. फक्त कचरा शिल्लक राहतो व नंतर तो आपण बाहेर फेकून देतो परंतु पुस्तक मात्र आपल्या घरी संग्रहित ठेवून शकतो एक दुसऱ्याला शुभप्रसंगी जसे की वाढदिवस, सेवानिवृत्ती दिनी, लग्नप्रसंगी सप्रेम भेट देऊ शकतो. त्यामुळे वाचन संस्कृतीचा वारसा पुढे नेण्यास मदत होते.

फटाक्यांचा आर्थिक दृष्टिकोनातून विचार केला तर खूप नुकसानदायक तर आहेच त्याचबरोबर महाग सुद्धा आहे. त्यापेक्षा पुस्तके हे स्वस्त असतात अगदी सर्वसामान्यांना परवडेल अशी पुस्तके पुस्तकालयात उपलब्ध आहेत. चैनीच्या वस्तूंपेक्षा पुस्तकांच्या किमती खूप कमी आहेत.शोकांतिका अशी की, वाचकांची संख्या मोबाईल,इंटरनेट मुळे दिवसेंदिवस कमी होतांना दिसून येत आहे, की ज्या पुस्तकांमुळे आपल्याला ताठ मान करून जगायला शिकवलं. ज्यांच्यामुळे आपलं अस्तित्व आहे. तेच रटाळवाण वाटतं, त्या बदल्यात मनोरंजन आणि चैनीच्या वस्तू,तरुण मंडळींचा धूम्रपान, मद्यपानावरील खर्च अफाट होत आहे. दररोज संध्याकाळी तरुण मंडळी मद्यपानाच्या दुकानावर,पान टपरीवर,कट्ट्यांवर शेकडोच्या संख्येत दिसतील,परंतु तेच पावले जर पुस्तकालयाकडे वळली तर, एक ज्ञानी,संस्कार शील पिढी घडेल. महिला सुरक्षित राहतील. अन्याय,अत्याचार थांबतील अन एक समृद्ध संस्कार शील भारतीय समाज घडल्याशिवाय राहणार नाही. फटाक्यांच्या आवाजा मुळे भू-प्रदूषण, वायू प्रदूषण तर होतेच त्याचबरोबर त्यातील कार्बन डाय-ऑक्साइड व काळ्या धुराने आपल्या शरीरावर वाईट परिणाम होताना दिसून येतात. लहान मुलांच्या श्वसनाला त्रास होताना दिसून येतो त्याचप्रमाणे वयोवृद्ध की ज्यांना दमा -अस्थमासारखे आजार आहेत त्यांना अति कर्णकर्कश आवाजामुळे हृदयविकाराची झटके येऊन मृत्यू सामोरे जावे लागते.फटाके पेटवताना झालेल्या चुकीमुळे अन संवेदनशील फटाक्यामुळे जसे कि,चक्र, झाडी, रॉकेट यामुळे मुलांचे हात भाजले आहेत. मुलं अपंग झाले आहेत तर अति भयंकर आवाजामुळे काहींना कायमचा बहिरेपणा आलेला दिसून येत आहे, अशा कित्येक घटना आपल्या डोळ्यासमोर घडलेल्या दिसून येतात.शासनाने वेळोवेळी फटाक्यांवर बंदी आणली आहे परंतु आपल्या अति महत्त्वाकांक्षामुळे हे सर्व नियम, कायदे पायदळी पुरवल्या जात आहे. त्यातून किती समाज विघातक कार्य घडताना दिसून येत आहे,याउलट आरोग्य विषयक सल्ला देणारे साप्ताहिक,पाक्षिक, मासिक, कादंबऱ्या,पुस्तकातून आरोग्याची काळजी कशी घ्यावी याचे मार्गदर्शन केले जाते. पुस्तक मनुष्याला कधीच शारीरिक, मानसिक अपंगत्व निर्माण करत नाही उलट मनातील अपंगत्व दूर करतात.मनोबल वाढवतात. कानांना बहिरेपणा आणत नाही तर चांगल्या दर्जेदार वाचनातून आरोग्याची काळजी घेऊन,सावध कसे जगले पाहिजे याची कानउघडनी करतात त्याचबरोबर डोळ्यांना अपंगत्व न आणता सत्य डोळ्यासमोर आणून डोळे उघडतात. फटाके अति ज्वलनशील असल्यामुळे त्यांना आगीपासून जपावे लागते. काळजी घ्यावी लागते, अन्यथा आग लागण्याची दाट शक्यता असते. निष्काळजीपणामुळे कितीतरी दुकानांना आग लागलेली दिसून येते त्याचबरोबर फटाके इतरत्र उडून आग लागलेली आपण बघतो,त्यातून कितीतरी वित्त- जीवित हानी होताना दिसून येते,याउलट पुस्तक मात्र वाचकांच्या हातात शोभून दिसतात.मनातील अहंकार राग द्वेषाची आग शमवितात. सतमार्गावर घेऊन जातात. पुस्तकांना जपावं लागत नाही तर तेच आपल्याला जपतात. धर्मग्रंथ, दर्जेदार पुस्तकं मनातील वाईट विचारांची आग विझवतात व संस्कारशील मानव घडवतात. तर कधी अन्यायाविरुद्ध पेटवून उठण्यासाठी मशाल बनतात.

फटाक्यांची उलाढाल थोडी-थिडकी नाही तर तब्बल साडेचार ते पाच हजार कोटी रुपयांची आहे आणि त्याचा क्षणात चुरडा होतो. हे जर आपण देशाच्या विकासासाठी खर्च केले केले तर दिवाळीमध्ये छान एकमेकांना भेटवस्तू म्हणून पुस्तके,खेळणे मिठाई दिली तर किती छान होईल. पुस्तकांचे महत्त्व सांगावे तेवढे कमीच....! पुस्तक वाचनामुळे मानवाचा आंतरबाह्य विकास होतो.वाचनाने वाणीवर सुसंस्कार होतात. भाषा शुद्ध होते. विचारांची देवाणघेवाण होते.ज्ञानवृद्धी होते आणि विशेष म्हणजे वाचनातून आनंद निर्मिती होते अर्थात मनुष्याचा सर्वांगीण विकास होतो. चला तर मग यावर्षीच्या दिवाळी पासून मनाशी एक संकल्प करू.फटाक्या ऐवजी तेवढ्याच किमतीचे आपल्या आवडीचे पुस्तके खरेदी करू. एकमेकांना दिवाळीनिमित्त भेट म्हणून पुस्तकच देऊ आणि वाचनसंस्कृतीचा वारसा पुढे नेण्याचा दृढ निश्चय मनी बाळगून, फटाके मुक्त, निरोगी दिवाळी साजरी करूया. बदलाची सुरुवात स्वतःपासून करूया. प्रदूषणापासून आपल्या धरणी आईचे रक्षण करूया.

**दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा....!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता. जि.बुलढाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

**दिवाळी स्पेशल रेसिपी...**

# चटपटीत क्रीस्पी फुले...



बऱ्याच मुलांना खाण्याचे अजिबात वेड नसते. खाण्यासाठी सतत मागे लागावे लागते त्यांच्या. अशावेळी जर त्यांचे लक्ष वेधून घेण्यासारखे आकर्षक असे काही ना काही बनवून त्यांना दिले तर नक्कीच ते आवडीने खातात. हा अनुभव कितीतरी आयांना येत असतोच. लांब कशाला, माझा मुलगा मंदारच्या बाबतीतही हा अनुभव आला आहे. अगदी रोजच्या पोळीचे सुद्धा कधी ABCD, कधी त्रिकोण, चौकोन, स्टार तर कधी प्राणी, पक्षी यांचे आकार केले की साधी पोळी सुद्धा त्याच्या नादाने जायची पोटात. त्यामुळे असे सतत काहीतरी नवीन बनवावे लागतेच तेही टेस्टी!

**आज आपण असाच एक पदार्थ बनवू. जो पाहून मुलेच काय, मोठ्यांना सुद्धा राहवणार नाही. उत्कंठा वाढली आहे ना? चला मग..**

**साहित्य :-**

अर्धी वाटी कणिक, अर्धी वाटी मैदा किंवा संपूर्ण कणिक वापरली तरी चालते, २ चमचे तांदुळाची पिठी किंवा कॉर्न फ्लोअर, खमंग करायचे असतील तर १ चमचा ओवा आणि पाव चमचा हिंग घालावा व चवीनुसार मीठ घालावे. आणि गोडाची फुले बनवायची असतील तर अगदी किंचीत चवीसाठी फक्त मिठ घालावे. २ चमचे गोड करताना तुपाचे

मोहन घालावे, तिखट, मिठाचे करताना तेलाचे मोहन घालावे, वरून भूरभुरण्यासाठी तिखट, चाट मसाला.

**कृती :-**

प्रथम एका मोठ्या बाऊलमध्ये कणिक, मैदा, पिठी, मिठ, दोन्ही हातांवर चोळून ओवा, हिंग, तेलाचे एकदम कडकडीत मोहन घालावे.

नंतर लागेल तसे थोडे थोडे आणि घालत त्याचा घट्ट गोळा बनवून घ्यावा व तो १० मिनिटे घट्ट झाकून ठेवावा.

नंतर तो पुन्हा छान मळून घेऊन तेलाचा हात लावून त्याचे पोळी सारखे उंडे करून पातळ पोळी लाटून घ्यावी. आता या पोळीच्या चारी बाजू सुरीने कापून मधला चौकोनी भाग ठेवावा. आता त्याच्या साधारण दीड ते दोन पेरा एवढ्या लांबट पट्ट्या कापून घ्याव्यात. नंतर एकेक पट्टी घेऊन त्याची थोडी बाजू एकाबाजूने तशीच ठेवून बाकी पट्टीला शक्य तितक्या जवळ जवळ सुरीने कट द्यावेत. सजावटीच्या झिरमिळ्या बनवतो त्याप्रमाणे बनवून त्याला गोल वेटोळे देऊन घट्ट रोल बनवावा म्हणजे खाली देठ आणि वरती पाकळ्या प्रमाणे दिसेल. हवे तर हिरवा खाण्याचा रंग देठाना लावावा. अशा प्रकारे सगळी फुले बनवून ठेवावीत.

नंतर गॅसवर कढई ठेवून फुले तळण्यासाठी त्यात तेल घालावे. तेल गरम झाले की ही फुले क्रीस्पी होईपर्यंत मस्त तळून घ्यावीत. मस्त केशरी,तांबूस रंगाची ही फुले चाळणीत काढून तेल निथळले की वरून आवडीनुसार तिखट, चाट मसाला भुरभुरून सर्व्हिंग डिशमध्ये काढून सर्व्ह करावीत. ही गरम पण छान लागतातच पण थंड झाल्यावर जास्त क्रीस्पी बनतात आणि मस्त कुरकुरीत चटपटीत लागतात.

**वैशिष्ट्य :-**

ही फुले साधारण तिखटमीठाच्या शंकरपाळी सारखी लागतात. चाट मसाल्यामुळे जास्तच सुरेख लागतात. भरपूर दिवस टिकतात. या प्रमाणेच बनवून साजूक तुपात तळून वरती पिठीसाखर,वेलची पुड भुरभूरावी किंवा साखरेचा किंचीत लिंबू पिळून, वेलची, केशर घालून दोनतारी पाक करून त्यात फक्त बुडवून काढून सुकवले तरी हि गोडाची फुले खूप सुंदर लागतात. पाकाच्या चमकदारपणा मुळे खूपच आकर्षक दिसतात. पाहूनच खाण्याचा मोह आवरणार नाही आणि एकदा सुरुवात केली की मोह आवरणे कठीण होते.

**- सौ.स्नेहा मुसरीफ, पुणे.**

# खऱ्या लोकप्रतिनिधींचा चेहरा...

# जनतेच्या अश्रूंमध्ये दिसणारा आरसा...



लोकशाही ही जनतेच्या विश्वासावर उभी असते. जनतेचा प्रतिनिधी म्हणजेच लोकप्रतिनिधी हा त्या विश्वासाचा आधारस्तंभ असतो. पण आज प्रश्न असा उभा आहे की, आपण निवडून दिलेला लोकप्रतिनिधी खरोखर जनतेचा आहे का, की फक्त सत्तेचा? खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी म्हणजे तो जो आपल्या मतदारसंघातील माणसांचे दुःख स्वतःचे दुःख मानतो, त्यांचा आवाज विधानसभेत किंवा संसदेत बुलंद करतो, आणि जनतेच्या डोळ्यांत आशेची ज्योत पेटवतो. लोकप्रतिनिधी हा केवळ निवडणुकीच्या काळात न दिसता, संकटाच्या क्षणी जनतेसोबत उभा राहतो, त्यांच्यासाठी लढतो, त्याग करतो.

आजचे चित्र मात्र काळजाला चटका लावणारे आहे. निवडणूक संपली की जनता विसरली जाते. त्यांचे प्रश्न, त्यांचे अश्रू, त्यांचे हक्क यांची दखल घेतली जात नाही व जनतेचा आवाज दाबला जातो. सत्तेची आसक्तीमुळे काही लोकप्रतिनिधींचा खरा चेहरा सत्ताकेंद्राच्या दालनात दिसतो. तेथे जनतेचे नाही, तर खुर्चीचे राजकारण चालते. भ्रष्टाचार व स्वार्थामुळे जनतेचे पैसे विकासासाठी खर्च होण्याऐवजी स्वतःच्या संपत्तीसाठी वापरले जातात. जनता अंधारात राहते, पण नेत्यांचे बंगलो उजळून निघतात. संवेदनाहीनतामुळे शेतकरी आत्महत्या करतो, कामगार उपाशी राहतो, महिला अत्याचाराला बळी पडते, तरुण बेरोजगार होतो पण लोकप्रतिनिधींच्या डोळ्यांत पाणी दिसत नाही.

खऱ्या लोकप्रतिनिधीचा चेहरा, खरा लोकप्रतिनिधी म्हणजे जो संकटात जनतेला सोडून पळून जात नाही, तर तिच्या खांद्याला खांदा लावून उभा राहतो, जो मतांसाठी नव्हे, तर माणसांसाठी जगतो, जो स्वतःचे घर नाही, तर मतदारसंघाचे घर उजळवतो आणि जो पक्षापेक्षा प्रामाणिकपणाला आणि सत्तेपेक्षा सेवेला महत्त्व देतो. असा लोकप्रतिनिधी दुर्मीळ झाला आहे. पण जेव्हा कुणी खरा नेता उभा राहतो, तेव्हा जनतेच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहतात, कारण त्यांना वाटते हो, हाच आमचा खरा प्रतिनिधी आहे.

आजची लोकशाही केवळ निवडणुकीपुरती सीमित राहिली आहे. निवडून आलेल्या प्रतिनिधींनी लोकांशी असलेली आत्मिक नाळ विसरली आहे. हा चेहरा बदलायला हवा. अन्यथा लोकशाही ही फक्त कागदावरील व्यवस्था राहील, जनतेच्या हृदयातील श्रद्धा नाही. लोकप्रतिनिधी हे पद नाही, ती जबाबदारी आहे. ते गौरव नाही, तर सेवा आहे. त्यात खोटेपणा असेल तर लोकशाही मरेल; पण जर त्यात प्रामाणिकपणा, त्याग आणि संवेदनशीलता असेल तर लोकशाही जिवंत राहील.

आज जनतेला हवेत भाषण करणारे नेते नव्हेत, तर त्यांच्या डोळ्यांत डोळे घालून, त्यांच्या हातात हात घालून चालणारे खरे लोकप्रतिनिधी. खरा लोकप्रतिनिधी हा केवळ चेहरा नसतो, तो म्हणजे जनतेच्या स्वप्नांचा, आशांचा आणि विश्वासाचा आरसा आणि त्या आरशात जर जनता स्वतःला पाहते, तेव्हाच तो नेता खरा ठरतो.

**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

# दिवाळीचे बदलते स्वरूप !



जसा काळ सरत गेला तसा मानवाच्या राहणीमानातही बदल होत गेला. वाहतुकीची विविध साधने आल्याने जुनी बैलगाडी, टमटम यांसारखी वाहतुकीची साधने कालबाह्य झाली. बाजारात जाऊन आवश्यक वस्तूंची खरेदीही आता हळूहळू कमी होत चालली आहे. गरजेच्या सर्व वस्तू आता ऑनलाईन ऑर्डर करून घरपोच मागवल्या जाऊ लागल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत माणसाच्या पोषाखांतही कमालीचा बदल झालेला दिसून येतो. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्यामुळे तर मानवाचा समाजाशीही हळूहळू संबंध तुटू लागला आहे. शहरासारख्या ठिकाणी धावपळीच्या जीवनाचा प्रभाव आता सण-उत्सव साजरे करण्यावरही होत चालला आहे.

पूर्वी दसरा सरला की दिवाळीच्या स्वागताची तयारी सुरु होत असे. अख्खे घर झाडून त्याला रंगरंगोटी केली जात असे. घरातील बच्चे कंपनीपासून वयोवृद्धही आपापल्या परीने या मोहीमेत उत्साहाने सहभागी होत असत. साफसफाई झाली कि घराघरांतून दिवाळीच्या फराळाचे सुगंध येऊ लागत. या फराळ बनवण्याच्या प्रक्रियेतही घरातील समस्त मंडळी आपापल्या परीने सहभागी होत असत. घरातील कर्त्या पुरुषाचा बोनस झालेला असायचा, मग टेलरकडे जाऊन नवीन कपडे शिवण्यासाठी माप दिले जाई. कंदिलासाठी काठ्या गोळा करून सुरीने तासून आणि मापात कापून त्यापासून आकाशकंदील बनवला जाई किंवा माळ्यावर ठेवलेला कंदिलाचा जुना सांगाडा काढून त्याला नवीन कागद लावला जाई. घरातील महिला वर्गाची रांगोळ्यांची विशेष तयारी चालू असायची. ठिपक्यांच्या रांगोळीसाठी कागदावर मापात रेषा आखून अगरबत्तीच्या साहाय्याने त्यावर छिद्रे पाडली जात. गेल्या वर्षीचे शिल्लक रंग आणि रांगोळी यांचा अंदाज घेऊन नवीन रंग खरेदी करण्याचा बेत आखला जात असे. ४ दिवसांत दारात कोणत्या ४ रांगोळ्या काढायच्या त्या वहीच्या पानावर पेन्सिलने काढून त्यामध्ये रंग कोणते भरायचे हेही निश्चित केले जात असे. बच्चे कंपनी मातीचे किल्ले बनवण्याची तयारी करत. त्यासाठी आवश्यक साहित्याची जमवाजमव केली जात असे. आपण बनवलेला किल्ला इतरांपेक्षा अधिक उठून कसा दिसेल याची आगळी चढाओढ चालत असे.

नरक चतुर्दशीच्या पहाटे लवकर उठून अभ्यंग स्नान करायचे म्हणून त्याची तयारी आदल्या संध्याकाळपासूनच केली जात असे. घरातील गृहिणी घरीच उटणे बनवत असे. दिवाळीच्या गुलाबी थंडीत पहाटे लवकर उठून अंगाला सुगंधी तेल आणि उटणे लावून आंघोळ करण्यात आणि त्यानंतर अंगठ्याने नरकासुराचे प्रतीक म्हणून अंगठ्याने कारेटे फोडून त्याची कडुशार बी जिभेवर ठेवण्यात वेगळीच मौज असे. दिवाळीच्या पहिल्या आंघोळीची सर वर्षभरात पुन्हा कधीच अनुभवाला येत नसे. सहामाही परीक्षा संपून बच्चे कंपनीला दिवाळीची सुट्टी लागलेली असायची. सुट्टी पडल्यावर सर्वप्रथम मुले शाळेत शिकवल्यानुसार शुभेच्छापत्र बनवायची आणि या शुभेच्छा पत्रांवर दिवाळीच्या शुभेच्छांसह आपुलकीचा संदेश लिहून ती पोस्टाने आपल्या आप्तेष्टांना आणि मित्र मंडळींना पाठवत. घरी बनवलेल्या फराळाच्या विविध पदार्थांची शेजाऱ्या पाजाऱ्यांकडे देवाणघेवाण व्हायची. घरोघरी जाऊन मोठ्यांचे आशीर्वाद घेतले जात असत.

आता मात्र चित्र बदलले आहे. शहरासारख्या ठिकाणी घरातील स्त्री पुरुष दोघेही नोकरी व्यवसायानिमित्त प्रतिदिन घराबाहेर पडत असल्याने दिवाळीच्या तयारीवर आणि सण साजरा करण्यावर ऑनलाईनचा आणि रेडिमेडचा प्रभाव दिसू लागला आहे. अनेक घरांत अर्बन किंवा तत्सम कंपन्यांची माणसे बोलावून घराची साफसफाई आणि रंगरंगोटी केली जाते. दारात रांगोळी काढण्यासाठी पुरेसा वेळ नसल्याने किंवा रांगोळी काढण्याची कला अवगत करण्यासाठी कधी प्रयत्नच न केल्यामुळे रांगोळीचे स्टिकर्स लावले जातात किंवा रांगोळीसाठी तयार छापे वापरले जातात. वाढती मागणी लक्षात घेऊन रांगोळ्यांचे विविध आकाराचे छापे आता बाजारातही मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहेत. कंदीलही रेडिमेड विकत आणून दारावर लावले जाऊ लागले आहेत. मातीच्या पणत्यांची जागा आता विजेच्या तोरणांनी घेतली आहे. दैनंदिन कामाच्या दगदगीत फराळ तरी केव्हा बनवणार त्यामुळे दिवाळीसाठीचा फराळही रेडिमेड विकत आणला जाऊ लागला आहे. लोकांची वाढती मागणी लक्षात घेऊन रेडिमेड फराळाच्या उद्योगालाही गती मिळू लागली आहे. विकत आणलेला फराळ बेताचाच असल्याने आणि तो रेडिमेड असल्याने शेजारीपाजारी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ऐन दिवाळीतही टेलर्सची दुकाने ओस पडू लागळी आहेत, रेडिमेड कपड्यांचा प्रभाव वाढल्याने सराईत टेलर्सनी सुद्धा टेलरिंग सोडून रेडिमेड कपड्यांच्या अल्टेशनला सुरुवात केली आहे. भाऊ बहिणींना भाऊबीजेच्या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या भेटवस्तू सुद्धा त्यांना भाऊबीजेच्या आधीच मिळू लागल्या आहेत, त्यामुळे यंदा दादा ताईकडून काय भेटवस्तू मिळणार याबाबतची उत्सुकताच संपून गेली आहे. हल्ली तर किल्लेही रेडिमेड मिळू लागले आहेत. शुभेच्छापत्र रेडीमेड मिळू लागली आहेत. आता तर शुभेच्छापत्रांचा काळही संपत चालला आहे. प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आले आहेत आणि त्यात व्हॉटस्अपही आहे. आता शुभेच्छांची देवाणघेवाणही व्हॉटस्अपवर होऊ लागली आहे. दिवाळीनिमित्त सुट्टी मिळते म्हणून इतर सुट्यांप्रमाणे दिवाळीलाही लोक उशिरा उठू लागले आहेत. त्यामुळे अभ्यंग स्नान तर बाजूलाच राहिले. शहरातील लोकांचे राहणीमान उंचावल्याने पूर्वी ज्या प्रकारे दिवाळी श्रीमंतांच्या घरी साजरी होत असे तशी आता चाळीचाळींतूनही ती साजरी होऊ लागली आहे. कामाच्या व्यापामुळे आणि वेळेच्या अभावामुळे आताच्या पिढीला दिवाळीची सारी सिद्धता करण्यास वेळ मिळत नसेलही मात्र रेडिमेडच्या नादात दीपावलीचा खरा आनंद आपण गमावत आहोत हे मात्र नक्की ! शहरातील धकाधकीच्या जीवनातही काही मंडळी आपली संस्कृती जोपासत आहेत, परंपरांचे पालन करत आहेत; मात्र या घरांतील कॉन्व्हेंट मध्ये, इंग्रजी माध्यमांमध्ये शिकणारी भावी पिढी ही परंपरा पुढेही चालवतील का ? की करिअरच्या नादात आपल्या संस्कृतीला विसरतील हाही एक प्रश्न आहे. हिंदू धर्मियांनी आजतागायत काळानुसार आपल्या परंपरांमध्ये, चालीरीतींमध्ये बदल केलेला आहे. मात्र आपण आपल्या संस्कृतीशी जेव्हढी तडजोड करू तेव्हढे खऱ्या आनंदापासून दूर जाऊ हेही तितकेच सत्य आहे.

**- जगन घाणेकर,**
**घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

























## वृक्षवल्ली

झाडे आमुचे जीवन
त्यांचे उपकार धन्य
यांच्या सम उपयोगी
नाही कुठे कुणी अन्य

देती हवेत गारवा
सावलीही देती खास
पावसा देती आव्हान
पशु पक्षांचे निवास

यांचे पोषण कार्बन
प्राणवायू आम्हा देती
औषधी गुण यांच्यात
माती धूप थांबविती

फळे बनविती पुष्ठ
गुण चव त्यांची इष्ट
वेळ काळ बांधिलकी
नको लागू यांना दृष्ट

**डॉ. सौ. अनुपमा पाटील**
**ठाणे**










## बहुरूपी वारसा...

अभावाने बहुरूपी
दिसतात कधीतरी
लोपणा–या परंपरा
जपतात कशातरी

घेतात रूपे नवनवे
विविधांगकितीतरी
जीवओते उमजूनि
अभिनया परोपरी

जनमनोरंजन करी
हिंडतात दारो दारी
हुबेहूब नक्कल ती
अस्सले पेक्षा भारी

लोकमात्र हिणकस
कसे त्यांना धुत्कारी
कोणसांगे सांग त्या
नाहीत ते भिकारी

पोचते का तिथवरी
अनुदान ते सरकारी
वध करा कलेचा या
टपले कैक शिकारी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**




# खस्ता रोज साटा !

ही एक कच्छ येथील सुप्रसिद्ध मिठाईचा प्रकार आहे. पारंपारीक पद्धतीने साटा कसा बनवतात ते पाहू चला... दरवर्षी दिवाळीमध्ये आपण गोड लाडु, करंजी, शंकरपाळी, चिरोटे असे पदार्थच करतो. यावर्षी तसेच पण किंचित बदल करुन अधिक आकर्षक, स्वादिष्ट, थोडेसे वेगळे पदार्थ बनवले तर ? पाहूया ना मग..

**साहित्य :**

सव्वा वाटी मैदा, अर्धी वाटी बारीक रवा, २ चिमूट किंवा अर्धा चमचा खाण्याचा सोडा, किंचीत मीठ , ३ चमचे साजूक तूप, १ चमचा रोज सिरप, पाव चमचा रोज इसेन्स, १ वाटी दूध, २ वाट्या साखर, तळण्यासाठी तूप, सजावतिसाठी ड्राय गुलाब पाकळ्या, ड्रायफ्रुट्स.

**कृती :**

सर्वांत आधी मैदा छान चाळुन त्यात रवा, चावीसाठी किंचित मीठ सोडा घालून हाताने छान एकत्र करावे. मग त्यात तूप घालून दोन्ही हातानी छान चोळून ५..७ मिनिटे व्यवस्थित एकजीव करावे. नंतर थोडे थोडे दूध घालत सावकाश छान कणिके प्रमाणे मळून घ्यावा. किमान अर्धातास घट्ट झाकून छान भिजून मुरु द्यावा. म्हणजे दूध तुपाने सॉफ्ट होईल, सोड्यामुळे छान फुगेल, रवा छान फुगून घट्टपणा येईल त्यामुळे साटे छान खुसखुशीत होतील. आता पीठ पुन्हा छान मळावे. जेवढे जास्त मळले जाईल तितके साटे खूपच सुरेख बनतात. मग त्याची मोठ्ठी व जाडसर पोळी लाटून वाटीने गोल आकारात कट करून घ्याव्यात. मग त्याला सुरीने टोचे मारावेत म्हणजे न फुगता छान क्रिस्पी होतील. अशा प्रकारे सर्व एकसारखे साटे बनवून घ्यावेत. कढईत तूप घालून आधी छान गरम करून घेऊन त्यात मंद आचेवर सर्व साटे लालसर रंगावर खुसखुशीत होईपर्यंत मस्त तळावेत. त्यानंतर एका कढईत साखर घालून १ वाटी पाणी घालून पाक करण्यास ठेवावा. १ तारी पाक होत आला की त्यात रोज सिरप व रोज इसेन्स घालावा व २ तारी पाक बनवून थोडा धंद करण्यास ठेवावा. थंड होत आला की एका ट्रे ला तूप लावून घ्यावे. एकेक करत सर्व साटे पाकात बुडवून लगेंच ट्रे मध्ये ठेवावेत. वरून पुन्हा थोडा पाक घालून त्यावर ड्रायफ्रुट्स आणि गुलाब पाकळ्या घालून सजवाव्यात. मग थंड झाले की सर्व्हिंग डिश मध्ये काढून थंड खुसखुशीत साटे सर्व्ह करावेत.

**वैशिष्ट्य :**

गुलाबाचा मंद सुगंध व साखरेची गोडी यामुळे हे साटे खूपच स्वादिष्ट लागतात. आणि क्रिस्पी तर खूपच होतात आणि बरेच दिवस छान राहतात. मग करायच्या ना यंदा ? वाचूनच करून पाहण्याची इच्छा होते आहे ना ? खाऊन तृप्त होणारच शिवाय नवीन काहीतरी दिवाळीसाठी खास केल्याचे समाधानही मिळते आणि सर्वांकडून प्रशंसा होते त्याचे समाधान मोठेच !

**सौ.स्नेहा मुसरीफ, पुणे.**



